**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये उभय बाजूंनी सादर केलेल्या कागदपत्रांचा विचार करून खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत :-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ८६७/ सोलापूर | श्री. शिवाजी शामराव काशीद शिवाजीनगर, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर | सह संचालक प्रशासन (साखर), साखर आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे | संचालक प्रशासन (साखर) साखर आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे | श्री. एस. आर. धाबेकर यांचेकडून प्रमाणित नसलेली रक्कम वसूल करणेबाबत केलेल्या तक्रारीवरील कार्यवाहीच्या माहितीच्या प्रती, अपिलीय प्राधिकारी यांचे नाव व हुद्दा इत्यादी. | अपीलकर्त्यास आवश्यक असलेली माहिती त्यांच्या घरी जाऊन देण्यात आली आहे. तसेच जादा आलेली फी रू. १२६/- परत केल्याची अपीलकर्त्याच्या नातेवाईकाची पोच जन माहिती अधिकारी तथा सहनिबंधक,सहकारी संस्था लेखापरीक्षण (साखर) यांनी दि. १३.१०.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर केली. |
| २ | ८८१/ सोलापूर | श्री. शिवाजी शामराव काशीद शिवाजीनगर, वैराग, ता. बार्शी, जि. सोलापूर | सहनिबंधक, सहकारी संस्था (लेखापरीक्षण), साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे | संचालक प्रशासन (साखर), साखर आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे | लेखापरीक्षक श्री. अनिल शामराव सोनवणे यांनी वरिष्ठ कार्यालय साखर आयुक्तालय यांचे आदेशावरून सोलापूर - पुणे प्रवास केला, सदर प्रवासाची तक्त्याप्रमाणे सविस्तर माहिती, अपिलीय प्राधिकारी यांचे नाव व हुद्दा इत्यादी. | अपीलकर्त्यास आवश्यक असलेली माहिती त्यांच्या घरी जाऊन देण्यात आली आहे. तसेच जादा आलेली फी रू. १२६/- परत केल्याची अपीलकर्त्याच्या नातेवाईकाची पोच जन माहिती अधिकारी तथा सहनिबंधक, सहकारी संस्था लेखापरीक्षण (साखर) यांनी दि. १३.१०.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर केली आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

१) वरील तक्त्यातील एकूण २अपिले अनुक्रमांक १ ते २ (अपील क्र ८६७/ सोलापूर व ८८१ /सोलापूर ) निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**

**दि. २३.०९.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.शशिकांत नारायण वसगडेकर
अमित अपार्टमेंट, सांभारे रोड, गावभाग, सांगली-४१६४१६ अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सांगली उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी, सांगली

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ८९५ / सांगली /२००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.३०.५.२००७ |
| ३ | पुनर्विलोकन सुनावणी तारीख | दि.२७.११.२००७ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.शशिकांत नारायण वसगडेकर
अमित अपार्टमेंट, सांभारे रोड, गावभाग, सांगली-४१६४१६

**अपिलीय प्राधिकारी** तथा अधीक्षक, भूमी अभिलेख, सांगली श्री.व्ही.एन.परदेशी

**जन माहिती अधिकारी** तथा नगर भूमापन अधिकारी, सांगली श्री.डी.एम.खैरमोडे

## विवेचन

अपीलकर्ता श्री.शशिकांत नारायण वसगडेकर यांच्या अपील क्र.८९५/सांगली निकालानुसार कार्यवाही न केल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा नगर भूमापन अधिकारी श्री.डी.एम.खैरमोडे व अपिलीय प्राधिकारी श्री.व्ही.एन.परदेशी यांच्यावर शास्तीची व प्रशासकीय कारवाई करावी, या मागणीसाठी निकालाचे पुनर्विलोकन करण्याची विनंती करणारा अर्ज श्री.वसगडेकर यांनी दि.२४.८.२००७ रोजी राज्य माहिती आयोगाकडे केला. तसेच श्री.वसगडेकर यांना प्रतिकात्मक भरपाई म्हणून जन माहिती अधिकाऱ्यांनी रु.५००० द्यावेत, याबाबत सहानुभूतीपूर्वक विचार होऊन ती रद्द होऊन मिळावी, अशी मागणीही श्री.वसगडेकर यांनी अर्जात केली आहे. अपीलकर्त्याला आवश्यक असलेले नकाशे न देता चुकीचे व दिशाभूल करणारे नकाशे वेगळ्या तारखांचे दिले, मागणीत नमूद असलेल्या तारखेचा मोजमापाचा नकाशा श्री.खैरमोडे व श्री.परदेशी यांनी मुद्दाम गहाळ केला असून त्या तारखेला नकाशा तयार करण्यात आलेला नाही, असे ते खोटे सांगत आहेत, असे नमूद करुन श्री.वसगडेकर यांनी याबाबतचे नवे पुरावे आपण सादर करीत असल्याचे आयोगास कळविले. श्री.वसगडेकर यांचे निवेदन व वय(६९), तसेच सातत्याने त्यांनी सादर केलेली निवेदने लक्षात घेता आयोगाने फेरसुनावणी घेतली. श्री.खैरमोडे व श्री.परदेशी यांनी जुनेच नकाशे नव्या तारखेचे म्हणून पुन्हा दिले आहेत, त्यावर सही नसल्यामुळे अनधिकृत म्हणून आधी सांगितलेला नकाशाच अधिकृत नकाशा म्हणून दिला, इत्यादी मुद्दे नवे पुरावे म्हणून त्यांनी सादर केले. मात्र हेच मुद्दे श्री.वसगडेकर यांनी पूर्वीही मांडले होते. श्री.खैरमोडे व श्री.परदेशी यांच्याविरुध्द वृत्तपत्रांमध्ये आलेल्या काही बातम्या, तसेच श्री.परदेशी यांच्यावर भ्रष्टाचाराबद्दल वेळोवेळी प्रशासकीय स्तरावर केली गेलेली कारवाई याच्या प्रती त्यांनी पुरावे म्हणून सादर केले असून 'अशा भ्रष्ट अधिकाऱ्याने दिलेले म्हणणे विचारात घेऊ नये,' अशी मागणी केली आहे. आपण श्री.वसगडेकर यांना योग्य ती सर्व कागदपत्रे दिली आहेत. वारंवार तेच मुद्‌दे श्री.वसगडेकर मांडत आहेत. नकाशाबाबतची स्पष्टता उच्च न्यायालयापासून विविध पातळ्यांवर वेळोवेळी आपण केली आहे, असे प्रतिपादन करुन श्री.खैरमोडे व श्री.परदेशी यांनी

श्री.वसगडेकर यांच्या आरोपांचा इन्कार केला. श्री.वसगडेकर यांना आयोगाच्या आदेशानुसार रु.५००० नुकसान भरपाईचा डिमांड ड्राफ्ट आपण पाठविला होता परंतु त्यांनी तो नाकारला, असे श्री.खैरमोडे यांनी लेखी व तोंडी नमूद केले. श्री.खैरमोडे यांनी केलेली फसवणूक आणि अवमानता यांचा निषेध नोंदविण्यासाठी आपण सदरची रक्कम परत केल्याचे श्री.वसगडेकर यांनी नमूद केले. श्री.परदेशी हेच या प्रकरणाचे मूख्य सूत्रधार असून त्यांच्याविरुध्द कारवाई व्हावी, अशी मागणी श्री.वसगडेकर यांनी केली.

श्री.वसगडेकर यांनी कोणतेही नवे मुद्दे अथवा पुरावे मांडलेले नाहीत. तसेच त्यांनी सादर केलेले पुरावे म्हणजे त्यांनी पूर्वीच्याच अपिलांमध्ये मांडलेल्या मुद्दयांचीच पुनरावृत्ती आहे. श्री.परदेशी यांच्याविरुध्द भ्रष्टाचाराबाबत झालेली प्रशासकीय कारवाई, त्याबाबतच्या तसेच त्यांच्याविरुध्दच्या अन्य तक्रारीबाबतच्या व श्री.खैरमोडे यांच्याबद्दलच्याही अशा स्वरुपाच्या वृत्तपत्रातील बातम्या ही बाब गंभीर असली तरी श्री.वसगडेकर यांच्या संदर्भित अपिलात तो पुरावा ठरु शकत नाही. खोटी कागदपत्रे केली, फसवणूक केली, या आरोपांबाबत श्री.वसगडेकर योग्य त्या न्यायासनाकडे दाद मागू शकतात, माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मध्ये त्याचा निर्णय करता येणार नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

श्री.शशिकांत नारायण वसगडेकर यांची पुनर्विलोकनाची मागणी व तक्रार अमान्य करण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. १० .९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम,२००५च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -१

श्री. राणोजी कृष्णा भोसले
मु. पारगांव, पो. व ता. खंडाळा, **अपीलकर्ता**
जि. सातारा

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी तथा** तहसीलदार,
ता. खंडाळा, जि. सातारा **उत्तरवादी**

**जन माहिती अधिकारी तथा** गांव कामगार तलाठी,
मु. पारगांव, पो. व ता. खंडाळा, जि. सातारा

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९०३ / २००९ / सातारा |
| २ | जन माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. २८.४.२००९ |
| ३ | अपिलीय प्राधिकाऱ्याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १०.७.२००९ |
| ४ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** - मु. पो पारगांव, पो. व ता. खंडाळा, जि. सातारा येथील ग. नं. ११५४ मधील फेरफार नं. २२८७ दि. १६.८.२००८ ची नोंद तलाठी यांनी योग्य त्या कार्यपध्दतीचा अवलंब न करता अधिकार अभिलेखात नोंद घालणे चुकीचे व पुर्णपणे निरर्थक (Void) असल्याने ती रद्द करणेत यावी. | |

## विवेचन

अपीलकर्ता, श्री. राणोजी भोसले यांनी राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेल्या अपिलासोबत जोडपत्र अ, जोडपत्र ब तसेच जनमाहिती अधिकारी यांचे उत्तर इ. कोणतीही आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. तसेच त्यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये केलेली मागणी व अपिलासोबत जोडलेले अपिलीय प्राधिकारी यांचे आदेश पाहता अपिलीय प्राधिकारी यांचे आदेश योग्य आहेत. श्री. भोसले यांनी माहिती अर्जान्वये केलेली मागणी ही प्रशासकीय कार्यवाहीबाबतची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५अंतर्गत येत नाही.

सबब आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :-

## आदेश

अपील दाखलस्तरावर निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**स्थळः- पुणे**
**दि.३०-९-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम , २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे-४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठाकडे दाखल करण्यात आलेल्या अपिलांमध्ये खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहेत:-

| अ. क्र. | अपील क्रमांक | अपीलकर्ता | जन माहिती अधिकारी | अपिलीय प्राधिकारी | मूळ अर्जातील माहितीची मागणी (संक्षिप्त) | निष्कर्ष |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | ९०४/ २००९/ पुणे | श्री.शिवदास रंगनाथ साळुंके श्रीनिवास अपार्टमेंट, फ्लॅट नं. १४-बी, आनंदनगर, सनसिटी रोड, सिंहगड रोड, पुणे | सचिव, दख्खन पाटबंधारे मंडळ (मध्य.), सिंचननगर सह.गृहरचना संस्था, २०८, रेंजहिल्स रोड, पुणे-२० | अध्यक्ष, दख्खन पाटबंधारे मंडळ (मध्य.), सिंचननगर सह.गृहरचना संस्था, २०८, रेंजहिल्स रोड, पुणे-२० | श्री.विनोद शंकर गुरव सभासद यांचा (अ) भाग दाखल्या विषयी (ब) पावतीवर सभासदांची नावे सोडल्याबाबत | मुंबई उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडीपठाने याचिका क्र.५६६६/२००७ मध्ये दिलेल्या निर्णयानुसार गृहनिर्माण संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ लागू होत नाही. संबंधित संस्था माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अन्वये 'सार्वजनिक प्राधिकरण'ठरते, असे अपीलकर्त्याचे म्हणणे असल्यास तसे पुरावे त्यांनी सादर करणे आवश्यक आहे. |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| २ | ९१५/ २००९/ पुणे | श्री.विठ्ठल दशरथ डुंबरे उत्तमापूर फेरीवाले, व्यापारी संघ, ओतूर, ता.जुन्नर, जि. पुणे | वाहतुक अधिकारी, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, शंकरशेठ रोड, पुणे-३७ | विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ, शंकरशेठ रोड, पुणे-३७ | डी.सी.ओ.श्री.एस. एस.चव्हाण हे कार्यालयात पदावर रुजू झाल्यापासून, आजपर्यंत किती वर्षे सेवेत कार्यरत आहेत याबाबतची माहिती | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| ३ | ९१७/. २००९/ पुणे | श्री.संजीव ज्ञानेश्वर गव्हाणे थापेवाडी, पो.पाबळ, ता.शिरुर, जि.पुणे | माहिती अधिकारी, विमानतळ पोलीस ठाणे खराडी, चंदननगर बायपास, पुणे-नगर हायवे, पुणे | अपिलीय प्राधिकारी, विमानतळ पोलीस ठाणे खराडी, चंदननगर बायपास, पुणे-नगर हायवे, पुणे | संबंधित अधिकारी श्री.रामदास जाधव यांच्या संबंधात उदा. दि.०१.१०.२००८ ते १५.१०.२००८ पर्यंत कोणत्या पदावर कार्यरत होते, कोणत्या पाळीमध्ये कार्यरत होते. त्यांची हजेरी पत्रकाची झेरॉक्स प्रत व त्या अनुषंगाने कार्यालयातील माहिती | अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक कागदपत्रे जोडलेली नाहीत. |
| ४ | ९१८ / २००९/ पुणे | श्री.विश्वास भांबुरकर बी/७२, सॅटेलाईट सेंटर, वस्त्रपूर, अहमदाबाद ३८० ०१५ | माहिती अधिकारी, इंदिरा इन्स्टीट्यूट ऑफ मॅनेजमेंट "तपस्या" स.नं.८५/५-अ, नवीन पुणे- मुंबई हायवे, न्यू वाकड पोलीस चौकीजवळ, पुणे-३३ | अपिलीय प्राधिकारी इंदिरा इन्स्टीट्यूट ऑफ मॅनेजमेंट "तपस्या" स.नं.८५/५-अ, नवीन पुणे- मुंबई हायवे न्यू, वाकड पोलीस चौकीजवळ, पुणे-३३ | इंदिरा इन्स्टीट्यूट ऑफ मॅनेजमेंट पुणे या संस्थेला एमबीए,एमसीए कॉलेजच्या इमारतीबाबत, तसेच सदर शिक्षण संस्थेच्या कार्यकारी मंडळावरील सदस्यांचा व्यवसाय, शैक्षणिक पात्रता इत्यादीच्या अनुषंगाने एकूण ६ मुद्दयांची माहिती | १) अपीलकर्त्याने अपिलासोबत आवश्यक मुद्रांक शुल्क (रु.२०/-) जोडलेले नाही. २) माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ नुसार संस्था 'सार्वजनिक प्राधिकरण'ठरत नसल्याने संस्थेला हा कायदा लागू होत नाही, असे संस्थेचे |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | म्हणणे आहे. संबंधित संस्था माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ अन्वये ‘सार्वजनिक प्राधिकरण’ ठरते असे अपीलकर्त्याचे म्हणणे असल्यास तसे पुरावे त्यांनी सादर करणे आवश्यक आहे. |

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

वरील तक्त्यातील एकूण ०४ अपिले अनुक्रमांक १ ते ४ (अपील क्र. ९०४/२००९/, ९१५/२००९/पुणे, ९१७/२००९/पुणे व ९१८/२००९/पुणे ) निकाली काढण्यात येत आहेत.

**( विजय कुंवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ०४-०९-२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ,
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे -४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' दिनांक २७.०६.२००८ रोजी पुणे येथे आयोजित करण्यात आला होता. त्यात खालील अपिलाचा समावेश होता :

| | | | |
|---|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९१८ / पुणे | उपस्थिती |
| २ | अपीलकर्ता | श्री. रमेशलाल हिरकचंद सिंगी<br>श्री विहार सोसायटी, सेक्टर बी,<br>बिल्डिंग नं.अे-८, फ्लॅट नं.३,<br>निगडी, पुणे ४११ ०४४ | हजर |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी<br>मर्यादित, भोसरी विभागीय कार्यालय,<br>टेल्को रोड, भोसरी,<br>पुणे ४११ ०२६ | हजर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी<br>मर्यादित, भोसरी विभागीय कार्यालय,<br>टेल्को रोड, भोसरी,<br>पुणे ४११ ०२६ | हजर |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. रमेशलाल हिरकचंद सिंगी यांनी जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,भोसरी यांचेकडे दि.६ जानेवारी २००७ रोजीचे अर्जान्वये चिखली प्राधिकरण येथे सिध्द मानव डेव्हलपर्स या बिल्डरच्या एकूण ३४ सदनिकांच्या नवीन बांधकामास वीजपुरवठा करण्यासाठीच्या तांत्रिक अंदाजपत्रकातील बाबींची तपशीलवार माहिती देण्याची मागणी केली होती.

जन माहिती अधिकारी यांनी दि.१२.१२.२००७ रोजी अहवाल सादर करुन असे अवगत केले आहे की, माहिती अधिकारांतर्गत अपीलकर्त्याने दि.०६.०१.२००७ रोजी अर्ज केला होता. दि.१५.०१.२००७ रोजीचे पत्रान्वये अर्जातील त्रुटी पूर्ण करणेस अर्जदारास कळविले होते. दि.१९.०१.२००७ रोजी त्रुटीची पूर्तता केली. दि.०५.०२.२००७ रोजी अपीलकर्त्यास टपालासोबत माहिती दिली. अपीलकर्त्याने दि.२६.०२.२००८ रोजीचे पत्रान्वये माहिती मिळाली नसल्याचे कळविले. त्याप्रमाणे नव्याने दि.०४.०६.२००७ रोजी टपालाने माहिती देण्यात आली. तथापि अपीलकर्त्याने स्विकारली नाही.

'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त अपिलकर्त्याने शास्तीची कारवाई व्हावी, अशी विनंती केली आहे. मात्र तत्कालीन जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी उपस्थित नव्हते. विद्यमान जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्याचे मागणीप्रमाणे पूर्ण माहिती दिली असल्याबाबत निवेदन केले आहे. दि.१२.१२.२००७ रोजीचे अहवालात माहिती संदर्भात दिलेला तपशील पाहता जन माहिती अधिकारी यांनी अपीलकर्त्यास माहिती दिली आहे.अपीलकर्त्याने सादर केलेल्या जन माहिती अधिकारी यांच्या दि.०४.०६.२००७ रोजीचे पत्रावर तसा शेरा ठेवला आहे.

उक्त वस्तुस्थिती विचारात घेता आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दिनांक : १४ - ०९-२००९**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम, १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ,पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला
कौन्सिल हॉल समोर, पुणे - ४११००१

श्री. बाळासाहेब संपतराव ताकपिरे
नविन जैन मंदिराशेजारी,
लंकेश्वर निवास, कुर्डुवाडी रोड, मु. पो. ता बार्शी,
जि. सोलापूर

**अपीलकर्ता**

अपिलीय प्राधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती बार्शी,
जि. सोलापूर

**उत्तरवादी**

जन माहिती अधिकारी तथा
उप अभियंता,
जिल्हा परिषद उप विभाग, बार्शी
जि. सोलापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९२०/ सोलापूर |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.११.१२.२००७ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि.१५.१२.२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. २८.१२.२००७ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ०४.०२.२००८ |
| ६ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती :- श्रीमती सुनिता पाटील, उप अभियंता जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, बार्शी यांच्या सेवा पुस्तकाची झेरॉक्स प्रत. | |

**विवेचन**

अपीलकर्ते श्री. बाळासाहेब ताकपिरे यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ अन्वये जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता उपविभाग, बार्शी श्रीमती सुनिता पाटील, यांच्याकडे उप अभियंता जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, बार्शी यांच्या सेवा पुस्तकाची झेरॉक्स प्रत. मागितली होती. त्रयस्त पक्षाची

माहिती असल्याने जन माहिती अधिकारी यांनी त्यांचा अर्ज फेटाळला, अपिलीय प्राधिकारी यांनी सदर अर्ज कार्यकारी अभियंता क्र - १ सोलापूर याच्याकडे पाठविण्यात आल्यामुळे माहिती कार्यकारी अभियंता सोलापूर यांच्याकडून घ्यावी, असाबाबत निर्णय दिला. त्याविरूध्द श्री. ताकपिरे यांनी आयोगाकडे अपील दाखल केले आहे.सदर अपीलाचा समावेश दि. ८.१०.२००८ रोजीच्या 'विशेष अपिल निर्गत कार्यक्रमा'त करण्यात आला होता. उभयतांमध्ये एकमत न झाल्याने या अपिलाची सुनावणी त्याच दिवशी घेण्यात आली.

अपिलाच्या अनुषंगाने अपीलकर्त्यास आवश्यक असलेल्या सेवा पुस्तकातील छायांकित प्रती योग्य ते शुल्क अपीलकर्त्याने भरल्यास माहिती देण्याचा मौखीक आदेश सुनावणीच्या वेळी आयोगाने दिला त्यानुसार जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग बार्शी यांनी दिनांक २३.१०.०८ रोजी अपीलकर्त्यास माहिती दिल्याची पोच दि. १८.११.०८ रोजीच्या पत्रान्वये आयोगास सादर केली.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :-

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.१८.०९.२००९**

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, पुणे विभाग, पुणे राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत,चौथा मजला,
विधान भवन समोर, पुणे १

श्री. प्रकाश विनायक पवार
५२१/क, शनिवार पेठ, पुणे-३० — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,
भू-संपादन व व्यवस्थापन,
पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
भूमी आणि जिंदगी कार्यालय,
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९४ + ३९६+५८८+२९०३ /२००९/ पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १२.८.२००९ |

३. **उपस्थित**

**अपीलकर्ता -** श्री. प्रकाश विनायक पवार
५२१/क, शनिवार पेठ, पुणे-३०

**अपिलीय प्राधिकारी** तथा उप आयुक्त,
भू-संपादन व व्यवस्थापन, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. सुधाकर तेलंग

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक अभियंता,
भूमी आणि जिंदगी कार्यालय, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. चंद्रशेखर अकवारे

| अपील क्र. | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | प्रथम अपिलाची तारीख | अपिलीय प्राधिका-याच्या आदेशाची तारीख |
|---|---|---|---|---|
| १४/२००९ | ३.२.२००९ | -- | ३.३.२००९ | २५.३.२००९ |
| ३९६/२००९ | २३.३.२००९ | -- | २४.४.२००९ | ५.५.२००९ |
| ५८८/२००९ | २.३.२००९ | २३.३.२००९ | १३.४.२००९ | ५.५.२००९ |
| २९०३/२००९ | २०.११.२००८ | -- | २०.१२.२००८ | २.१.२००९ |

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

अपील क्र. १४ + ३९६ + ५८८ + २९०३ /२००९/ पुणे - सोबत छायांकित प्रत जोडली आहे.

## विवेचन

मराठा भांडीवाले सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या संदर्भात आपण वारंवार मागितलेली माहिती दिली जात नाही. या संस्थेचा आपण मूळ विस्थापित प्रवर्तक सभासद असून अद्यापही आपले पुनर्वसन झालेले नाही, त्यामुळे आपले आर्थिक नुकसान होत आहे. पुणे महानगरपालिकेने गैर विस्थापितांसाठी भाडेपट्टा, करारनामा केला आहे. याबाबतचे कुलमुखत्यारपत्र बेकायदेशीर व नियमबाह्य आहे, असे प्रतिपादन अपीलकर्ता श्री. प्रकाश विनायक पवार यांनी केले. संस्थेने इतिवृत्त ठेवलेले नाही. काही बाबींना राज्य शासनाची मान्यता घेतलेली नाही, इ. मुद्देही त्यांनी मांडले.

श्री पवार यांच्या माहिती - मागणीच्या मूळ अर्जात त्यांनी फक्त कायद्यातील तरतुदी, नियम या स्वरुपाचीच माहिती मागितली आहे. अनुषंगिक सर्व पत्रव्यवहार मूळ नस्तीमध्ये उपलब्ध आहे. त्यांना तो दाखविण्यात आला आहे. त्यांची मूळ तक्रार प्रशासकीय कारवाईची आहे. त्याबाबत ते वारंवार अर्ज करीत असतात व त्याविषयीची माहितीही त्यांना देण्यात आली आहे, असे प्रतिपादन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता श्री. चंद्रशेखर अकवारे व अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त, श्री. सुधाकर तेलंग यांनी केले. श्री. पवार यांचे निवेदन व त्यांनी सादर केलेली कागदपत्रे पाहता मूळ अर्जाव्यतिरिक्त माहिती व प्रशासकीय कारवाईची मागणी त्यांनी अपिलांमध्ये केली आहे. माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील विहित कार्यपध्दतीत हे सुसंगत नाही. तथापि अपेक्षित असलेल्या नेमक्या कागदपत्रांबाबतचे पत्र त्यांनी जन माहिती

अधिकारी तथा सहाय्यक अभियंता यांना द्यावे व जन माहिती अधिकाऱ्यांनी त्यानुसार त्यांना कागदपत्रांच्या प्रती पुरवाव्यात, असे मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिले.

आयोगाने दिलेल्या आदेशानुसार नेमक्या कागदपत्रांची स्पष्ट मागणी करणारा अर्ज श्री. पवार यांनी दिला नसल्याचे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी दि. २५.९.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले. श्री. पवार यांनी नोव्हेंबर २००८ पासून या विषयात माहितीच्या अधिकारात नऊ अर्ज केले असून या प्रकरणातील नस्तीमधील सर्व माहिती त्यांना उपलब्ध करुन देण्यात आली आहे. बहुतेक सर्व अर्जांमध्ये त्यांनी कागदपत्रांची मागणी केलेली नसून कार्यालयीन कार्यवाही त्यांना अपेक्षित आहे. एक प्रकारे आपल्याला अपेक्षित कामासाठी मनपा सेवकांवर याप्रकारे दबाव आणण्याचा प्रयत्न ते करीत आहेत, असे लेखी निवेदन अपिलीय प्राधिकारी यांनी दि.२९.९.२००९ रोजी आयोगाला सादर केले.

श्री. पवार यांनी मागितलेली माहिती त्यांना देण्यात आली आहे. त्यांनी उपस्थित केलेले संस्थेच्या कार्यपध्दतीतील त्रुटी व कायदेशीरपणा याबाबतचे मुद्दे, तसेच त्यांच्या स्वतःच्या पुनर्वसनाची मागणी या बाबी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाहीत.

आयोगाचे आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**( विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ, पुणे**

**पुणे**
**दि. ३० .०९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. दिपक सोमेश्वर जोशी
१४, कृष्णा सोसायटी, ३५२/१०, बोटक्लब, — अपीलकर्ता
पुणे- ४११ ००१

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
पुणे महानगरपालिका, पुणे — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा विकास अभियंता,
ड्रेनेज प्रकल्प, पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९४९ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | १३.८.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. दिपक सोमेश्वर जोशी
१४, कृष्णा सोसायटी, ३५२/१०, बोटक्लब, पुणे- ४११ ००१

**अपिलीय प्राधिकारी** तथा नगर अभियंता,
पुणे महानगरपालिका श्री. व्ही. जी. कुलकर्णी

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

दि. ८.८.२००५ रोजीच्या माझ्या अर्जावर किती दिवसात आपण स्टॉर्म वॉटर नाला बाबत ना हरकत प्रमाणपत्र देणे आपल्यावर नियमाप्रमाणे बंधनकारक आहे, स्टॉर्म वॉटर नाल्याची माझे स.नं.१७/२अ मध्ये डी.पी. प्रमाणे किती रूंदी आहे, या अनुषंगाने अनेक मुद्दयांची माहिती

## विवेचन

मौजे वडगावशेरी, ता. हवेली, जि.पुणे येथील आपल्या जमिनीवरील सीमाभिंतीच्या नकाशाच्या नूतनीकरणासाठी ड्रेनेज विभागाकडून 'ना हरकत प्रमाणपत्र' दि. ८.८.२००५ पासून आपण मागणी करीत असूनही मिळाली नाही, अशी अपीलकर्ता श्री. दिपक सोमेश्वर जोशी यांची तक्रार आहे. त्या अनुषंगाने त्यांनी मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी तथा विकास अभियंता, ड्रेनेज प्रकल्प, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी चुकीची व दिशाभूल करणारी दिली, या कारणावरून श्री. जोशी यांनी अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे यांच्याकडे अपील केले. 'श्री. जोशी यांनी त्यांचे अर्जात नमूद केलेल्या वडगांवशेरी स.नं.१७/२अ क्षेत्र ५५००० चौ.फुटाचे मिळकतीचा मालक असून सीमाभिंतीचा प्लॅन पास करून घेतला आहे. त्यांनी ड्रेनेज एन.ओ.सी. ची मागणी केलेली आहे. त्यांचे प्लॉटचे मागे पुढे काही ठिकाणी २ - ३ मी. नाल्याची रूंदी दाखविलेली आहे. सदर ठिकाणी महानगरपालिकेचे संबंधित कन्सलटंट यांचे सर्व्हेक्षणानुसार १५ मी. रूंदी असणे आवश्यक आहे, असे नमूद केले आहे. डिझाईनमधील चुकीबाबत महापालिका आयुक्त यांचे निदर्शनास ही बाब आणून देणेत यावी व दुरूस्तीबाबत महापालिका आयुक्त यांचे आदेश घ्यावेत,' असे आदेश अपिलीय प्राधिकारी यांनी दिले. परंतु तरीही आपल्याला अचूक माहिती मिळालेली नाही, अशा कारणावरून श्री. जोशी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

कोणतीही माहिती व उत्तर मिळाले नाही, असे प्रतिपादन श्री. जोशी यांनी आयोगापुढील सुनावणीत केले. अपीलकर्त्याच्या जमिनीतून नाला जात असून त्याबाबतचा हा प्रश्न आहे. संबंधित विषय महानगरपालिका आयुक्तांपुढे ठेवण्यात आला असून त्यांच्या आदेशानुसार कार्यवाही करण्यात येईल, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका, पुणे श्री. व्ही. जी. कुलकर्णी यांनी केले. आपल्याला ड्रेनेज विभागाकडून 'ना हरकत प्रमाणपत्र' मिळाले नसल्यामुळे आपल्या मिळकतीला सीमाभिंत बांधता येत नाही. आपल्या मिळकतीत अतिक्रमण झाल्यास ते काढण्याचे अथवा 'ना हरकत प्रमाणपत्र' देण्यास विलंब झाल्यामुळे होणाऱ्या नुकसानीची भरपाई करण्याचे महानगरपालिका मान्य करीत असेल तर विलंबाबाबत आपली तक्रार नाही, असे प्रतिपादन श्री. जोशी यांनी लेखी व तोंडी केले. अशी मागणी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही. मात्र मूळ विषयाच्या संदर्भातील नेमकी माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी चार दिवसांत देण्याचा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला, परंतु आपल्याला माहितीही मिळाली नाही व 'ना हरकत प्रमाणपत्र'ही मिळाले नाही, अशी तक्रार श्री. जोशी

यांनी दि. १९.९.२००८ च्या पत्रान्वये केली. श्री. जोशी यांना माहिती देण्यात आली असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा नगर अभियंता, पुणे महानगरपालिका श्री. व्ही. जी. कुलकर्णी यांनी आयोगाने विचारणा केल्यानंतर दि. ७.९.२००९ च्या पत्रान्वये आयोगास अवगत केले.

श्री. जोशी यांना माहिती देण्यात आली असून त्यातील कार्यवाहीबाबतचा त्यांचा आक्षेप आहे व 'ना हरकत प्रमाणपत्रा'ची त्यांची मागणी ही प्रशासकीय कार्यवाहीची असून माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अंतर्गत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य करण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ११ .९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. शरद रामण्णा शेट्टी
फ्लॅट नं.१४, प्रेमप्रभा, विरभद्रनगर, बाणेर
ता.हवेली, जि. पुणे

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी,पुणे-१८

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा सहाय्यक आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी,पुणे-१८

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९६६ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २४.६.२००८ |

३ **उपस्थित**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी,पुणे-१८ यांचेतर्फे
श्री. रामदास तांबे, उपशहर अभियंता

**जन माहिती अधिकारी** सहाय्यक आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी,पुणे-१८

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागाच्या आस्थापनेवरील आरोग्य निरीक्षक पदाची दि. १३.३.२००७ रोजी लेखी परीक्षा घेण्यात आली. त्या परीक्षेत उत्तीर्ण झालेले उमेदवार यांचे लेखी परीक्षेचे पेपर सर्टीफाईड कॉपीसह माहिती

# विवेचन

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आरोग्य विभागातील आरोग्य निरीक्षक पदाच्या लेखी परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांच्या छायांकित प्रतीची मागणी अपीलकर्ता श्री. शरद रामण्णा शेट्टी यांनी केली होती. 'पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील पदे भरताना लेखी परीक्षेच्या कामकाजासाठी नेमणूक करण्यात आलेल्या केंद्रप्रमुखांमार्फत लेखी परीक्षेचे कामकाज पूर्ण झाल्यानंतर मुलाखतीस पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी जाहीर करून, लेखी परीक्षेचे उमेदवारांनी दिलेले पेपर केंद्रप्रमुखांचे स्वाक्षरीने सील करण्यात येतात. आरोग्य निरीक्षक पदाकरिता घेण्यात आलेल्या लेखी परीक्षेचे पेपर देखील सील करण्यात आलेले असल्याने अर्जदाराने मागणी केलेली कागदपत्रे उपलब्ध करून देणे शक्य नाही,' असे जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यांनी श्री. शेट्टी यांना कळविले. हा निर्णय योग्य ठरवून अपिलीय प्राधिकाऱ्यांनी श्री. शेट्टी यांचे अपील नामंजूर केले. त्याविरूध्द श्री. शेट्टी यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाने दि. २४.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. अपीलकर्ता गैरहजर होते. त्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

श्री. शेट्टी अपिलाच्या सुनावणीस उपस्थित न राहिल्यामुळे पुढील तारीख देण्यात आली होती, परंतु त्यावेळीही ते उपस्थित राहिले नाहीत. श्री. शेट्टी यांनी न्यायालयामार्फत मागणी केल्यास व न्यायालयीन आदेश झाल्यास त्यानुसार संबंधित कागदपत्रे दाखविता येतील, हे जन माहिती अधिकाऱ्यांच्या उत्तरातील निवेदन रास्त आहे, असे अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी, पुणे यांनी निर्णयात नमूद केले आहे. त्याचा पुनरूच्चार त्यांनी दि. २४.६.२००८ रोजीच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रात केला आहे. या कार्यक्रमातही अपीलकर्ता गैरहजर होते. श्री. शेट्टी वेळोवेळी अशा प्रकारची अपिले करतात, परंतु एकाही सुनावणीस ते समक्ष उपस्थित राहिले नसल्याने त्यांचा माहिती मागणीचा हेतू स्पष्ट होत नाही, असे सहाय्यक आयुक्त, (प्रशासकीय), पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पुणे श्री. बी. जी. पवार यांनी लेखी निवेदनात म्हटले आहे.

श्री. शेट्टी यांनी उमेदवारांच्या उत्तरपत्रिकांची सरसकट मागणी केली आहे. तसेच सुनावणीला व 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'ला ते उपस्थित नव्हते अगर त्याबाबतचे कोणतेही लेखी निवेदन त्यांनी सादर केलेले नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ५ .९.२००९**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. विनोद रामचंद्र जैन
११, भूपति कॉम्प्लेक्स, भवानी एंटरप्रायझेस,
९८५, सदाशिव पेठ, पुणे-३० अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा अतिरिक्त आयुक्त (विशेष),
पुणे महानगरपालिका, पुणे उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उप आयुक्त (जनरल),
पुणे महानगरपालिका, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९८५ + ११२५ / पुणे |
| २ | सुनावणीची तारीख | २७.८.२००८ |

३ **उपस्थित**

**अपीलकर्ता** - श्री. विनोद रामचंद्र जैन
११, भूपति कॉम्प्लेक्स, भवानी एंटरप्रायझेस,
९८५, सदाशिव पेठ, पुणे-३०

**जन माहिती अधिकारी** तथा उप आयुक्त (जिं.घ),
पुणे महानगरपालिका, पुणे श्री. भानुदास माने

**मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**

उद्यान अधीक्षक पदासाठी महानगरपालिकेने प्रसिध्द केलेली जाहिरातीची प्रत, श्री. यशवंत खैरे यांनी उद्यान अधीक्षक पदाकरिता केलेले अर्ज व सोबत जोडलेली कागदपत्रे, श्री. खैरे यांनी १९८७ पासून आजपर्यंत कोण कोणत्या पदावर कामकाज सांभाळले त्याची तपशीलवार माहिती व कालावधी, सन २००७ मध्ये नदी अंतर्गत कामासाठी श्री. खैरे यांना कोणते पद देण्यात आले व या पदासाठी त्यांची पात्रता काय याची माहिती

## विवेचन

श्री. यशवंत खैरे यांनी पुणे महानगरपालिकेच्या उद्यान अधीक्षक पदासाठी केलेल्या अर्जानुसार सन १९८७ ते २००७ या काळात त्यांनी सांभाळलेले कामकाज या संदर्भात दि. १७.५.२००७ रोजी केलेल्या अर्जानुसार माहिती न मिळाल्याच्या कारणावरून अपीलकर्ता श्री. विनोद रामचंद्र जैन यांनी राज्य माहिती आयोगाकडे दोन अपिले केली आहेत.

श्री. जैन यांनी मागितलेली माहिती सेवकवर्ग विभागाशी संबंधित असल्यामुळे जन माहिती अधिकाऱ्यांनी सेवकवर्ग विभाग व उद्यान कार्यालय यांच्याकडून मागवून श्री. जैन यांना दिली. मुद्दा क्र. १ व २ ही माहिती दप्तरी उपलब्ध नसल्यामुळे देता येत नाही, असे सेवकवर्ग विभाग अधिकाऱ्यांनी कळविले. मुद्दा क्र.३ व ४ ची माहिती उद्यान विभागाने दिली. सह महापालिका आयुक्त, (जिं.घ.) यांनी या माहितीबाबतचा आवश्यक खुलासा अपीलकर्त्याला दोन दिवसांत कळवावा, असा आदेश अपिलीय प्राधिकारी तथा अतिरिक्त महापालिका आयुक्त (विशेष), पुणे महानगरपालिका यांनी दिला. सन १९८७ मध्ये उद्यान अधीक्षक हे पद भरण्यासाठी जाहिरात देण्यात आली होती. त्यावेळी श्री. खैरे यांनी सदर पद भरण्यासाठी देण्यात आलेली जाहिरात, या पदासाठी श्री. खैरे यांनी केलेला अर्ज व त्यासोबतची कागदपत्रे जतन केली नसल्याने ती दप्तरी उपलब्ध नसल्याचे उत्तर सेवकवर्ग अधिकारी यांनी दिले होते. 'महानगरपालिका प्रशासनाकडे नोकरभरतीची प्रक्रिया सातत्याने चालू असते. येणाऱ्या अर्जांची संख्या मोठ्या प्रमाणात असते,' असे सह आयुक्त (जिं.घ.) यांनी श्री. जैन यांना कळविले. हा खुलासा आपल्याला मान्य नाही व दिलेली माहिती दिशाभूल करणारी आहे. निवड केलेल्या सेवकांचे अर्ज कायम स्वरूपी जतन करणे बंधनकारक आहे, असे श्री. जैन यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अपिलात म्हटले आहे.

श्री. जैन यांनी सन १९८७ मधील माहिती मागितली आहे. ती दप्तरी उपलब्ध नसल्यामुळे देता येत नाही, असे श्री. जैन यांना त्यावेळीच कळविले होते, असे जन माहिती अधिकारी तथा सह आयुक्त, पुणे महानगरपालिका, पुणे यांनी नमूद केले. संबंधित माहिती आपल्या संदर्भातील असल्यामुळे आपल्याकडील कागदपत्रांच्या प्रती आपण देऊ, असे श्री. खैरे यांनी सांगितले.

मागितलेली माहिती २० वर्षांपूर्वीची असली तरी कागदपत्रांच्या वर्गवारीनुसार जतनाच्या कालावधीचा विचार करून राहिलेली माहिती अपीलकर्त्यास द्यावी. श्री. खैरे यांनी त्यांच्याकडील संबंधित माहिती देऊ केली आहे, त्यानुसार द्यावी, असा मौखिक आदेश आयोगाने सुनावणीच्या वेळी दिला.

आयोगाच्या आदेशानुसार आपल्याला माहिती मिळाली नसल्याची तक्रार श्री. जैन यांनी दि. १८.९.२००८ च्या पत्रान्वये आयोगाकडे केली. त्या अनुषंगाने आयोगाने दि. २३.१०.२००८ च्या पत्रान्वये श्री. माने व श्री. खैरे यांच्याकडून खुलासा मागविला. श्री. जैन यांनी मागितलेली माहिती सुमारे २० वर्षांपूर्वीची असून सेवकवर्ग विभागाच्या अखत्यारीतील आहे. माहिती उपलब्ध करण्याचा त्यांचा प्रयत्न चालू असून माहिती लपवून ठेवण्याचा त्यांचा कोणत्याही प्रकारचा उद्देश निदर्शनास आला नाही. माहिती उपलब्ध न झाल्यामुळे देण्यात आली नाही. तसेच दि. ७.५.२००८ पासून आपली बदली उप आयुक्त (जनरल), पुणे महानगरपालिका, पुणे या पदावर झालेली आहे, त्यामुळे अपिलीय प्राधिकारी म्हणून आपण त्यावेळी आयोगापुढील सुनावणीला उपस्थित होतो, असे श्री. माने यांनी दि. ७.८.२००८ रोजी सादर केलेल्या खुलाशात म्हटले आहे. श्री. जैन यांनी मागितलेली कागदपत्रे सेवकवर्ग विभागाकडे उपलब्ध नसल्यामुळे आपल्या व्यक्तिगत कागदपत्रांमधून उद्यान अधीक्षक पदासाठी महानगरपालिकेने दिलेली जाहिरात व या पदासाठी आपण केलेल्या अर्जासोबत दाखल केलेल्या कागदपत्रांच्या प्रती श्री. जैन यांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत, परंतु या पदासाठी आपण केलेल्या अर्जाच्या छायांकित प्रती व्यक्तिगत कागदपत्रातही उपलब्ध नसल्यामुळे देऊ शकत नाही. नोकरीसाठी छापील अर्जामध्ये भरली जाणारी माहिती सेवापुस्तकात नमूद असल्यामुळे सेवा पुस्तकातील सदर नोंदी असलेल्या पृष्ठांकाच्या प्रती श्री. जैन यांना उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत, असा खुलासा श्री. खैरे यांनी दि. ७.११.२००८ च्या पत्रान्वये केला.

पुणे महानगरपालिकेकडील वर्गवारीनुसार संबंधित कागदपत्रे तीस वर्षांपर्यंत जतन करणे, अशी प्रशासनाची जबाबदारी असताना ती देण्यास अधिकारी / सेवक जाणून बुजून टाळाटाळ करीत आहेत. श्री. खैरे यांच्या नेमणुकीबाबतच्या सन १९८३ ते १९८६ मधील कागदपत्रांच्या प्रती पिंपरी चिंचवड नगर रचना विभागाकडे आपण मागितल्या होत्या, त्या त्वरित मिळाल्या. पुणे महानगरपालिकेकडून मात्र त्या मिळत नाहीत. ही कागदपत्रे मिळणे आवश्यक आहे, असे निवेदन श्री. जैन यांनी दि. २४.१२.२००८ च्या पत्रान्वये आयोगाला सादर केले.

संबंधित कागदपत्रांच्या जतनाचा कालावधी लक्षात घेता त्याबाबतच्या नेमक्या वस्तुस्थितीची तपासणी पुणे महानगरपालिका आयुक्तांनी करावी व संबंधितांना योग्य ती समज देण्याबाबत कार्यवाही करावी.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाला काढण्यात येत आहेत.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
दि. ३० .९.२००९

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.कासम हैदर शेख
ई-५०, शास्त्रीनगर, येरवडा, पुणे-६ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा व्यवस्थापक,
शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय, पुणे-४११००१ — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,
शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय, पुणे-४११००१

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | ९९८ / पुणे / २००७ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२४.६.२००८ (वि.अ.नि.का.) |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.कासम हैदर शेख
ई-५०, शास्त्रीनगर, येरवडा, पुणे-६

**अपिलीय प्राधिकारी** तथा व्यवस्थापक,
शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय, पुणे-४११००१ श्री.यशवंतराव मोहिते

**जन माहिती अधिकारी** तथा प्रशासकीय अधिकारी,
शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय, पुणे-४११००१ विद्यमान सौ.एस.व्ही.देव
तत्कालीन-श्री.य.ना.मोहिते

| | | |
|---|---|---|
| ४ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १८.५.२००७ |
| ५ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. २.७.२००७ |
| ६ | प्रथम अपिलाची तारीख | दि. ३०.७.२००७ |
| ७ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. ६.८.२००७ |
| ८ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती** <br><br> कै.श्री.ए.व्ही.राऊत, सहा.व्यवस्थापक यांनी सन २००६ या वर्षात भ.नि.नि.मधून कर्ज मिळण्यासाठी किती अर्ज केले होते. अर्जाप्रमाणे कर्ज दिले होते का, असल्यास केव्हा, दिले नसल्यास त्याची कारणे, त्यांना याबाबत काही कळविले होते का, याचप्रमाणे श्री.सुधीर यशवंत वाळोदरे यांच्या अर्जाची माहिती द्यावी. वरील दोन्ही अर्जांबाबत कार्यालयाने त्यांना काहीच कळविले नसल्याने त्यांनी दि.२९.३.२००७ रोजी पुन्हा विनंती अर्ज केला, त्या अर्जावर कोणती कार्यवाही केली. | |

## विवेचन

दोन कर्मचाऱ्यांच्या भविष्य निर्वाह निधीबाबतची माहिती जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली नाही व अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपील फेटाळले, म्हणून अपीलकर्ता श्री.कासम हैदर शेख, (सहसचिव, फोटो रजिस्ट्री कामगार संघटना) यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे दि.२४.६.२००८ रोजी आयोजित केलेल्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'त या अपिलाचा समावेश होता. त्यावेळी उभय घटकांत एकमत न झाल्यामुळे सुनावणी घेण्यात आली.

'विशेष अपील निर्गत कार्यक्रमा'तील प्रपत्रातील नोंदी व उभय बाजूंनी सादर केलेली कागदपत्रे पाहता श्री.शेख यांनी दि.१८.५.२००७ रोजी माहिती मागणारा अर्ज केला होता. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय नोंदणी अधिकारी, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय, पुणे यांनी दि.२.७.२००७ रोजी उत्तर पाठविले. ते समाधानकारक नसल्यामुळे श्री.शेख यांनी अपिलीय प्राधिकारी तथा व्यवस्थापक, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय, पुणे यांच्याकडे अपील केले. परंतु माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम ४ पोटकलम (३) व (४) मध्ये अंतर्भूत

असलेल्या तरतुदीनुसार ही माहिती 'प्रसारित' म्हणजेच कार्यालयातील लेखा शाखेतील अभिलेखामध्ये उपलब्ध आहे व अपीलकर्ता त्याच कार्यालयातील कर्मचारी असल्याने त्यांना आवश्यक असलेली माहिती ते स्वत: अभिलेखातून प्राप्त करुन घेऊ शकतात. तसेच माहिती अधिकाराच्या कलम ८(१)(ज) मध्ये अंतर्भूत असलेल्या तरतुदीनुसार ही माहिती प्रकट करणे व्यापक लोकहिताच्या दृष्टीने आवश्यक असल्याची अपिलीय प्राधिकाऱ्याची खात्री पटलेली नाही, म्हणून ती प्रकट करण्याचा सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधांशी संबंध नाही, असा निष्कर्ष नोंदवून अपिलीय प्राधिकारी तथा व्यवस्थापक यांनी अपील फेटाळले. आपल्याला दिलेली माहिती बनवाबनवी करणारी व हवी ती माहिती न देता विपर्यस्त अशी दिली आहे, असे श्री.शेख यांनी प्रपत्रात व लेखी निवेदनात नमूद केले. भविष्य निर्वाह निधीच्या कर्जाबाबत या कार्यालयात कर्मचाऱ्यांना त्रास होतो. त्या अनुषंगाने मागितलेली माहिती दिली नाही व स्वत:चा पैसा स्वत:च्या भविष्यासाठी ठेवूनही कर्जाच्या वेळी त्याचा उपयोग होत नाही, असे श्री.शेख यांनी विस्ताराने नमूद केले. प्रशासकीय कामातील व्यग्रतेमुळे माहिती देण्यास विलंब झाल्याचे जन माहिती अधिकारी सौ.एस.व्ही.देव यांनी नमूद केले व आवश्यक ती माहिती पुरविण्यात आल्याचे जन माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांनी प्रपत्रात नमूद केले.

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ अन्वये जन माहिती अधिकाऱ्यांनी ३० दिवसात माहिती देणे आवश्यक होते. परंतु श्री.एम.सी.कुदळे यांनी विलंबाने माहिती दिली आहे. मागितलेली माहिती कार्यालयाच्या अभिलेखात असल्याचे आणि अपीलकर्त्याला ती कधीही उपलब्ध होऊ शकत असल्याचे अपिलीय प्राधिकारी तथा व्यवस्थापक यांनी नमूद केले आहे, हे लक्षात घेता इतक्या सहजतेने उपलब्ध असलेली माहिती देण्यास विलंब होण्याचे कारण नाही. तसेच मूळ अर्जातील मागणीनुसार माहिती दिलेली नाही, हा अपीलकर्त्याचा आक्षेप रास्त आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी श्री.एम.सी.कुदळे विलंबाने व विपर्यस्त माहिती दिल्याबद्दल शास्तीस पात्र ठरतात.

अपिलीय प्राधिकारी श्री.यशवंतराव मोहिते यांनी मूळ अर्जात मागितलेली माहिती व दिलेले उत्तर याचा विचार न करता अपील फेटाळले आहे. संबंधित अपीलकर्ता त्याच कार्यालयात सेवेला आहे की नाही, हा विषय माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कार्यवाहीशी संबंधित नाही. तसेच माहिती नाकारण्याचे समर्थन करताना त्यांनी काढलेला निष्कर्ष योग्य नाही. गांभीर्याने अपिलाची दखल घेतली नसल्याबद्दल अपिलीय प्राधिकारी श्री.यशवंतराव मोहिते यांना समज देण्यात येत आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील अंशत: मान्य.

(२) मूळ अर्जानुसार नेमकी माहिती देऊन केलेल्या कार्यवाहीचा खुलासा जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय यांनी १५ दिवसांत आयोगाला सादर करावा.

(३) तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री.एम.सी.कुदळे यांनी अपीलकर्ता श्री.कासम हैदर शेख यांना १६ दिवस उशिरा माहिती दिली आहे. त्यानुसार श्री.एम.सी.कुदळे यांना (१६x२५०) रु.३५००/- शास्ती लावण्यात येत आहे. व्यवस्थापक, शासकीय छायाचित्र नोंदणी कार्यालय यांनी श्री.कुदळे यांना ऑक्टोबर २००९ मध्ये मिळणाऱ्या सप्टेंबर २००९ च्या वेतनातून कपात करुन '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली शास्तीची रक्कम जमा करण्याची कार्यवाही करावी व याची नोंद त्यांच्या सेवापुस्तक व गोपनीय अहवालात घेऊन त्याच्या छायांकित प्रतींसह अहवाल आयोगाला १०.१०.२००९ पर्यंत सादर करावा.

**(विजय कुवळेकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि. ८ .९.२००९**